जा.क्र.जिपजा/सशिअ/का-1/2023/287
कार्यालय सर्व शिक्षा अभियान,
जिल्हा परिषद जालना.
दिनांक :26/05/2023.

प्रति,

1. गटशिक्षणाधिकारी,
   पंचायत समिती सर्व,
2. मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्रशाला सर्व,
3. मुख्याध्यापिका, केजीबीव्ही सर्व,

अंतर्गत जिल्हा परिषद जालना.

विषय : जालना येथे Super Thirty उपक्रमांतर्गत JEE/IIT/NEET परिक्षेच्या पुर्वतयारी शिकवणी वर्ग सुरु करणेचे अनूषंगाने दिनांक 02/06/2023 रोजी विदयार्थ्यांची निवड/चाळणी परिक्षा आयोजित करणेबाबत.

संदर्भ : दिनांक 25/5/2023 रोजी शिक्षण व क्रिडा समितीमध्ये घेण्यात आलेला निर्णय.

वरिल विषयी आपणास कळविण्यास अत्यंत आनंद होत आहे की, दिनांक 25/6/2023 रोजी झालेल्या जिल्हा परिषद शिक्षण व क्रिडा समिती बैठकीमध्ये जिल्हा परिषदेचा नाविण्यपुर्ण उपक्रम म्हणून जिल्हा परिषद प्रशाला जालना येथील परिसरामध्ये 15 मुली व 15 मुले असे एकूण 30 विदयार्थ्यांसाठी (Super Thirty ) JEE/IIT/NEET परिक्षेच्या पुर्व तयारीसाठी शिकवणी वर्ग दिनांक 15 जुन 2023 पासुन सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

सदर Super Thirty उपक्रमाची अंमलबजावणी खालील प्रमाणे करण्यात येणार आहे.

1. **दिनांक 11/6/2023 रोजी सकाळी 60 प्रश्न असलेली 120 गुणाची 2 तासाची परिक्षा सकाळी 11.00 वाजता ते 13.00 वाजता या वेळेत जिल्हा परिषद मुलांची प्रशाला जालना येथे घेण्यात येणार आहे. ज्यामध्ये**
   **1) Physics 30 गुण, (इयत्ता 10 वी पर्यंतचा अभ्यासक्रम)**
   **2) Mathematic 30 गुण (इयत्ता 10 वी पर्यंतचा अभ्यासक्रम)**
   **3) Chemistry 30 गुण (इयत्ता 10 वी पर्यंतचा अभ्यासक्रम)**
   **4) Biology 30 गुण (इयत्ता 10 वी पर्यंतचा अभ्यासक्रम)**
   ---------------------------------------------------------------
   **एकूण 120 गुण**
   ---------------------------------------------------------------
2. निवड/चाळणी परिक्षेत सहभागी होणा-या सर्व विदयार्थ्यांमधुन गुणवत्तेप्रमाणे 15 मुली व 15 मुलांची निवड करण्यात येईल.
3. निवड/चाळणी परिक्षेच्या दिवशीच त्याच ठिकाणी सायंकाळी 4 ते 5 या कालावधीत जाहीर करण्यात येईल.
4. Super Thirty मध्ये निवड झालेल्या मुला मुलींना इयत्ता 11 व 12 वी अभ्यासक्रमा सोबत JEE/IIT/NEET या परिक्षेच्या पुर्वतयारीचे सराव व शिकवणी देण्यात येईल.
5. यासाठी उच्च गुणवत्ताधारक 4 शिक्षकांची पुर्णवेळ शिकवणी वर्गासाठी जिल्हा परिषदेकडून निवड करुन त्यांना दरमहा रुपये 25000/- प्रमाणे मानधन अदा करण्यात येईल.
6. निवड झालेल्या विदयार्थ्यांची दोन वर्षासाठी निवास व भोजनाची व्यवस्था जिल्हा परिषदेकडून करण्यात येईल. यासाठी विदयार्थ्यांना/पालकांना कोणताही खर्च करावा लागणार नाही. एकदा प्रवेश निश्चित केल्यानंतर विशेष कारणाशिवाय प्रवेश रदद करता येणार नाही.
7. Super Thirty उपक्रमासाठी अदयावत अध्यापन कक्षाची नर्मिती करण्यात येणार आहे.

Scanned with OKEN Scanner

8. चाळणी परिक्षेला फक्त जिल्हा परिषद प्रशाला व कस्तूरबा गांधी बालिका विदयालयात शिकणा-या मुला-मुलींनाच सहभागी होता येईल.
9. खाजगी व्यवस्थापनाच्या विदयार्थ्यांना या निवड/चाळणी परिक्षेला बसता येणार नाही.
10. सदर उपक्रम हा फक्त 32 जिल्हा परिषद प्रशाला व 7 कस्तूरबा गांधी बालिका विदयालय यामध्ये शिकणा-या विदयार्थ्यासाठीच आहे.
11. मार्च 2023 मध्ये इयत्ता 10 वी ची परिक्षा दिलेले विदयार्थीच या चाळणी परिक्षेसाठी पात्र असतील. इयत्ता 9 वी मधून 10 वी मध्ये प्रवेशीत होणारे विदयार्थी यासाठी पात्र राहणार नाही.
12. सदर उपक्रमात सहभागी होऊ पाहणा-या विदयार्थ्यांनी http://forms.gle/67Kovbn hsALWsrs06 Google Form भरुन नोंदणी करावी.
13 Google Form व्दारे नोंदणी केलेल्या विदयार्थ्यांनाच निवड/चाळणी परिक्षेमध्ये सहभागी होता येईल.
14 सदर नाविण्यपूर्ण उपक्रम हा जिल्हा परिषद प्रशाला व कस्तूरबा गांधी बालिका विदयालयात शिकणा-या गरजू विदयार्थ्यांसाठी असून याबाबत मार्च 2023 मध्ये इयत्ता 10 वी ची परिक्षा दिलेल्या सर्व विदयार्थी व पालक यांना मुख्याध्यापकाने स्वत: कळवून त्यांना Google Form व्दारे नोंदणी करण्यासाठी परावृत्त करावे.
15 सर्व मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेतील मार्च 2023 मध्ये परिक्षा दिलेल्या सर्व विदयार्थ्यांनी नोंदणी केली किंवा नाही याची खात्री करावी. त्यांना शाळेत बोलवून घेऊन त्यांचेकडून Google Form भरुन घ्यावा.
16 शाळेतील मार्च 2023 मध्ये परिक्षा दिलेल्या सर्व इच्छूक मूलांकडून यासाठी नोंदणी करुन घेण्याची जबाबदारी संबधित शाळेचे मूख्याध्यापक व शिक्षक यांची राहील.
17. गटशिक्षणाधिकारी यांनी याबाबत तालूक्यातील सर्व प्रशालेतील नोंदणी बाबत दरारोज आढावा घेऊन शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद जालना यांना दैनंदिन अहवाल सादर करावा.
18 सदर उपक्रम हा अत्यंत महत्त्वाकांक्षी, गरीब, होतकरु आणि हूशार विदयार्थ्यांसाठी असल्याने तो यशस्वी करण्यासाठी सर्व स्थरातून पर्यंत करण्यात यावेत व सामाजिक बांधीलकी सर्वांनी जपावी.
19. सदर उपक्रमांतर्गत वर्ष 2025 मध्ये होणा-या JEE/IIT/NEETपरिक्षेची पूर्वतयारी निशुल्क करुन घेण्यात येईल.
20 उपक्रमाचे अनूषंगाने सर्व लाभार्थी विदयार्थ्यापर्यंत माहिती पोहचविण्यासाठी गटशिक्षणाधिकारी व संबधित शाळांचे मुख्याध्यापक यांनी या उपक्रमाला व्यापक प्रसिध्दी दयावी.
21. सर्व शाळांमधून निवड/चाळणी परिक्षेसाठी नोंदणी व्दारे विदयार्थी उपस्थित राहतील यासाठी योग्य ते नियोजन करण्यात यावे.

वरिल प्रमाणे मार्गदर्शक सुचनेनुसार ज्यास्तरावर कार्यवाही संबधित अधिकारी/मुख्याध्यापक यांनी करावी. कोणत्याही मार्गदर्शक सुचनेचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

सदर उपक्रम हा जिल्हा परिषद प्रशाला व कस्तूरबा गांधी बालिका विदयालयात शिकणा-या विदयार्थ्यांसाठी एक मैलाचा दगड ठरु शकतो याची जाणीव ठेऊन सर्वजण आप आपली जबाबदारी उत्तमरित्या पुर्ण करतील ही अपेक्षा.

Sd/-
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद जालना.

प्रतिलिपी :
1. मा. विभागीय आयूक्त औरगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. आयूक्त, मानव विकास कार्यक्रम, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
3. मा. जिल्हाधिकारी, जालना यांना माहितीस्तव सविनय सादर.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद जालना.

Scanned with OKEN Scanner